# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ जानेवारी, २०१७

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रामधील शासनाच्या जाहिरातींबाबत...

महोदय /महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १४ ऑक्टोबर, २०१६ च्या आचारसंहितेच्या आदेशातील परिशिष्ट-३, भाग-२, सत्तारुढ पक्ष, २-घोषणा व जाहिराती - या मुद्दयाखाली सत्तारुढ पक्षांना निरनिराळ्या प्रकारच्या कल्याणकारी योजना आणि इतर सवलतींची घोषणा करुन तसेच सार्वजनिक पैशातून मुद्रित होणाऱ्या किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादींद्वारे केंद्रात आणि राज्यातील शासनाची कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणून देऊन शासन पुरस्कृतरितीने आपल्या पक्षाचा प्रचार वाढविण्यासाठी अधिकाराचा वापर करण्यास बंदी आहे.

२. आचारसंहितेच्या कालावधीमध्ये राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शासनाच्या खर्चाने कोणत्याही जाहिराती देण्यावर बंदी असल्यामुळे अशा जाहिरातींमधून पक्षाच्या नेत्यांचे फोटो देखील छापण्यावर पर्यायाने बंदी आहे. त्यामुळे राज्यामध्ये महानगरपालिका, जिल्हापरिषद पंचायत समित्यांची निवडणूक आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रांमध्ये असलेले पेट्रोलपंप व इतर ठिकाणी जर केंद्र व राज्य शासनाच्यावतीने देण्यात आलेल्या जाहिरातींमध्ये मा. पंतप्रधान, मा.मुख्यमंत्री अथवा अन्य नेत्यांचे फोटो असल्यास, अशा जाहिराती काढून टाकाव्यात अथवा काढून टाकणे शक्य नसल्यास त्या झाकून ठेवण्यात याव्यात.

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

U:\WAHALE 13.*.19\Corporation\केंद्रशासनाच्या जाहिराती.docx/वागळे